वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) माध्य/शि/०१/काबि/७८२/२०२१दि.१८/१२/२००७
३) मा.आयुक्त सो.यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/काबि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
४) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय भोसरी यांच्याकडील दि.०५/०७/२०२१ चे पत्र
५) मा.उप आयुक्त माध्यमिक शिक्षण विभाग यांचा दि.२९- जुलै - २०२१ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/काबि/६०६/२०२१
दि.२९- जुलै -२०२१

विषय – नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.
श्रीम.शोभा बाबासाहेब भोसले (सहाय्यक शिक्षिका)
संगणक क्र.७८८७

आदेश,

श्रीम.शोभा बाबासाहेब भोसले "सहा.शिक्षिका" ह्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर दि.१५/०२/२००० सहाय्यक शिक्षिका या पदावर रूजु झालेले आहेत.त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारीख-१०/०९/१९६३ अशी असुन दिनांक -०९/०९/२०२१ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्ष पुर्ण होत आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम -१९८२ मधील नियम १०( १ ) नुसार गट "क" मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्रीम.शोभा बाबासाहेब भोसले यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्रीम.शोभा बाबासाहेब भोसले यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज, घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज, संगणक कर्ज,घर दूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम, कामगार कल्याण कर्ज तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही.भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्रीम.शोभा बाबासाहेब भोसले यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील, श्रीम.शोभा बाबासाहेब भोसले यांना माध्यमिक शिक्षण विभागाकडील आदेश क्र.माध्य/शि/०१/काबि/७८२/२००७दि.१८/१२/२००७ अन्वये दि.०३/१०/१९९६ ते ११/०४/२००० अखेर सेवा सेवानिवृत्तीसाठी ग्राह्य धरणेकामी सेवासातत्य देणेत आलेले आहे.सदर कालावधीचा फरक रक्कम रूपये २,८५,२६४/- (अक्षरी रक्कम रूपये दोन लाख पंच्याऐंशी हजार दोनशे चौसष्ट रूपये फक्त) श्रीम.शोभा बाबासाहेब भोसले यांना अदा करणेत आलेला आहे.परंतु सदरची रक्कम वसुलपात्र असलेबाबत मुलेप विभागाने आक्षेप उपस्थित केला असल्याने वसुलपात्र रूपये -२,८५,२६४/-(अक्षरी रक्कम रूपये दोन लाख पंच्याएंशी हजार दोनशे चौसष्ट रूपये फक्त) श्रीम.शोभा बाबासाहेब भोसले सहा.शिक्षिका यांच्या देय रक्कमेतुन वसुल करणे आवश्यक आहे.

श्रीम.शोभा बाबासाहेब भोसले यांना दि.०३/१०/१९९६ ते ११/०४/२००० अखेर वाचले क्र.०३ अन्वये सेवासातत्य देणेत आलेले असुन.सदरचे सेवासातत्य सेवानिवृत्तीला ग्राह्य धरणेबाबत नमुद करणेत आलेले आहे.तथापी श्रीम.भोसले शोभा बाबासाहेब यांचे मुळसेवानोंद पुस्तक १५/०२/२००० पासुन अद्ययावत ठेवणेत आलेले आहे.त्यामुळे श्रीम.शोभा बाबासाहेब भोसले यांची मनपा रूजु तारीख दि.१५/०२/२००० ही ग्राह्य धरून ३०/०९/२०२१ रोजी नियत वयोमानानुसार मनपा सेवेतुन सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

सबब, मी उप आयुक्त, माध्यमिक शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११०१८ उपरोक्त वाचले क्र.०३ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्रीम.शोभा बाबासाहेब भोसले "सहा.शिक्षिका" यांच्या देय रक्कमेतुन मुलेप आक्षेप रक्कम -२,८५,२६४/- (अक्षरी रक्कम रूपये दोन लाख पंच्याएशी हजार दोनशे चौसष्ट रूपये फक्त) वसुल करणेच्या अटीवर



Scanned with CamScanner

दि. ३०/०९/२०२१ रोजी मध्यान्हीनंतर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद श्रीम.शोभा बाबासाहेब भोसले "सहा.शिक्षिका" यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सही/-
(संदिप खोत)
उप आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिक
पिंपरी,पुणे -१८

प्रती,

श्रीम.शोभा बाबासाहेब भोसले "सहा.शिक्षिका"
माध्यमिक विद्यालय भोसरी

प्रतः- १) लेखा शाखा - श्रीम.भोसले शोभा बाबासाहेब सहा.शिक्षिका यांच्या देय रक्कमेतुन रक्कम रूपये -२,८५,२६४/- वसुल करणेत येउन त्याचा पुर्तता अहवाल सादर करणेत यावा.
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय भोसरी
२/- पुढील कार्यवाहीसाठी

(पराग मुंढे)
शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८



Scanned with CamScanner